सत्यमेव जयते

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 2267 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210/148/248, 22102222 Fax : 22673915

माझगांव कार्यालय

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई 400203 23742191 फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 23742191 Fax : 23781061

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१२

## अधिसूचना क्रमांक १४४२(२)(२)/२०१२/तीन

जाहिरात क्रमांक २२३/२०१२, दि. ७ मार्च, २०१२ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील **पोलीस उपनिरीक्षक** संवर्गातील ६०० पदांवरील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. २२ एप्रिल, २०१२ रोजी घेण्यात आलेल्या **पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा - २०१२** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१२ रविवार दिनांक २२ जुलै, २०१२** रोजी **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल.

२. **उपलब्ध पदसंख्या** :-

| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **१** | **पोलीस उप निरीक्षक** (एकूण ६०० पदे) | २८६ | ७९+४* | ४३+३* | १६ | ६ | ४ | १७ | ११+१३* | ११०+८* |
| | महिला - | ८६ | २५ | १४ | ५ | २ | १ | ५ | ७ | ३५ |
| | खेळाडू - | १४ | ४ | २ | १ | ० | ० | १ | १ | ६ |

२.१ * अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

२.२ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

२.३ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.४ प्रस्तुत भरतीकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० " लागू आहे.

३. **परीक्षेचे टप्पे**

३.१ सदर परीक्षा खालील तीन टप्प्यांत घेण्यात येईल :-

(अ) **लेखी परीक्षा** :- **४०० गुण**.

(ब) **शारीरिक चाचणी** :- **२०० गुण**.

(क) **मुलाखत** :- **७५ गुण**

३.२ पुरुष व महिला उमेदवारांकरीता उंची तसेच फक्त पुरुष उमेदवारांच्या बाबतीत छातीची मोजमापे ही आवश्यक अट असल्यामुळे या मोजमापांची तपासणी त्यांच्या शारीरिक चाचणीपूर्वी घेण्यात येईल. विहित उंची व छाती विषयक मोजमापाच्या अटी पूर्ण करणा-या उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत आयोगाच्या कार्यक्रमानुसार घेण्यात येईल.

४. **शुल्क** :-

**४.१** अमागास - रुपये ३१०/- **४.२** मागासवर्गीय - रूपये १६०/-

५. **मुख्य परीक्षेस प्रवेश** :-

**५.१ पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा - २०१२** च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक १५ जुलै,२०१२** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.२** जे उमेदवार पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते, परंतु **दिनांक १५ जुलै,२०१२** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**५.३** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे फक्त ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासंदर्भातील कार्यवाही करता येणार नाही.

**५.४** ऑनलाईन पध्दतीने आयोगास माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**५.५** विहित पध्दतीने आयोगास माहिती सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

५.६ प्रस्तुत परीक्षेसाठी आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल :-

(१) **भारतीय स्टेट बॅकेमध्ये चलनाद्वारे** (२) **क्रेडिट कार्ड** (३) **डेबिट कार्ड**

(४) **नेटबॅंकिंग** (५) **कॅश कार्ड**.

५.७ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबॅंकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरल्यास संबंधित बॅकेकडून आयोगास रक्कम हस्तांतरित झाल्यानंतर उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत (Payment Received) सूचना प्राप्त होईल. तसेच उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस आयोगाकडून पाठविण्यात येईल. याबाबत अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी उमेदवाराने स्वतः खातरजमा करावी.

५.८ भारतीय स्टेट बॅंकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यास दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

५.९ चलनाद्वारे रक्कम भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बॅकेत रक्कम भरल्याचा दिनांक आयोगास पाठवावा.

५.१० चलनाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क आयोगाने निश्चित केलेल्या कालावधीतच भरल्याची खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

५.११ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्यांच्या प्रोफाईद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

५.१२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

६. प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच **परीक्षा** या विभागातील "**पोलीस उपनिरीक्षक परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

७. सदर अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. प्रस्तुत मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

९. विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबॅंकिग, अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक १५ जुलै,२०१२** रोजी २३.५९ वाजेपर्यत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१०. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅकेमध्ये **दिनांक १६ जुलै,२०१२** पर्यत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

मुंबई :
दिनांक : ५ जुलै, २०१२.

**प्र.मा.आचरेकर**
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**